प्रतिवादी क्र.१ व ४ तर्फे उलटतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.

१७. माझे दहावी पर्यंतचे आजरा येथे शिक्षण झाले आहे. मी पुर्वीपासून वेळवट्टी येथे राहतो. मला इतर वादींनी त्यांच्या वतीने पुरावा देण्यासाठी वटमुखत्यारपत्र दिलेले आहे. मी ते या दाव्यात हजर केलेले नाही. मी सर्व वादींसाठी जबाब देत आहे. माझ्या वडिलांना प्रतिवादी क्र.१ भाऊ असून हौसाबाई पारपोलकर, मुक्ताबाई शिंदे, कमळाबाई सावंत आणि इंदूबाई जाधव या बहिणी आहेत. माझ्या आजीचे नाव जनाबाई आहे.

१८. प्रतिवादी क्र.९ हा माझा सावत्र चुलता असून त्याचे वडिल माझ्या वडिलांचे सावत्र भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, शामराव यांना कृष्णा नावाचा आणखी एक भाऊ आहे. शामरावच्या आईचे नाव धोंडूबाई आहे. माझ्या आजोबांना तीन पत्नी होत्या. माझ्या आजोबांच्या पहिल्या पत्नीचे नाव काशिबाई असून तिला आजोबां पासून दादू व रामचंद्र अशी दोन मुले होती. हे म्हणणे खरे नाही की, काशिबाईला आजोबांपासून कासूबाई दत्तू फगरे नावाची एक मुलगी होती.

१९. दादूला प्रतिवादी क्र.२, ३, बाळासाहेब, तानाजी व दिलीप अशी एकूण पाच मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दादूला शांताबाई शिंदे, गंगूबाई सावंत व अनूबाई अशा तीन मुली होत्या. रामचंद्रला केवळ सुरेश आणि चंद्रकांत अशी दोन मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, रामचंद्रला सुरेश व व चंद्रकांत व्यतिरिक्त रजनी, प्रकाश, पांडुरंग आणि मंदा अशी इतर अपत्ये आहेत. आम्ही आमच्या आजोबांच्या तीनही पत्नींच्या मुलांना या दाव्यात सहभागी केलेले नाही.

(न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.)

उलट तपास अपुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०८.०४.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.